**मालवाहु वाहनांमधून होणारी**
**जनावरांची वाहतूक**

# महाराष्ट्र शासन
## गृह विभाग

परिपत्रक क्र. एमव्हीआर-०३११/प्र. क्र. २४३/परि-२
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२, दिनांक : ७ मे, २०११

वाचा :- १) शासन अधिसूचना क्र.एमव्हीआर-०१०४/१४१/प्र.क्र.२२/परि-२ दि.१.१.२००५
२) शासन परिपत्रक क्र.एमआयएस-१५०५/३५/प्र.क्र.०६/परि-२ दि.१०.१.२००५
३) शासन परिपत्रक क्र.एमव्हीआर-११०९/२९६५/प्र.क्र.४२०/परि-२ दि.१७.११.२००९

**परिपत्रक**

महाराष्ट्र मोटार वाहने नियम १९८९ च्या नियम ८३ अन्वये वाहनांमधून जनावारांची वाहतुक करण्यासंबंधी तरतूद करण्यांत आली आहे. या नियमामध्ये शासन अधिसूचना दि.१.१.२००५ अन्वये सुधारणा करण्यांत येवून वाहनामध्ये छोटया/लहान प्राण्यांसाठी किमान ०.१५ चौ.मी. इतकी तळ जमीन ठेवणे आवश्यक असून इतर कोणत्याही गुरांची वाहतुक करताना वासरासह किमान २ मी. x ०.७५ मी. इतकी तळ जमीन ठेवणे आवश्यक करण्यांत आले आहे.

वरील सुधारित तरतुदीनुसार शासन परिपत्रक दि.१०.१.२००५ अन्वये अंमलबजावणी करण्याच्या सूचना देण्यांत आलेल्या आहेत. तथापि, याबाबत संबंधित क्षेत्रिय अधिका-यांकडून आवश्यक ती अंमलबजावणी होत नसल्याचे दिसून आल्याने शासन परिपत्रक दि.१७.११.२००९ अन्वये आवश्यकत त्या सूचना देण्यांत आलेल्या आहेत.

२. तथापि, शासन अधिसूचना दि.१.१.२००५ च्या तरतुदीनुसार वाहनांमधून जनावारांची वाहतुक करताना आवश्यक ती अंमलबजावणी होत नसून वाहतुकदाराकडून/वाहनमालकाकडून आवश्यक ती उपाययोजना होत नसल्यामुळे जनावरांचा मृत्यु होत असल्याचे शासनाच्या निदर्शनास आले आहे. त्यामुळे जनावारांची वाहतुक करताना नियमाअन्वये विहित केल्याप्रमाणेच वाहतुक केली जाईल याची सर्व संबंधित क्षेत्रिय कार्यालयानी दक्षता घ्यावी. शासन पत्र दि.१७.११.२००९ अन्वये दिलेल्या निदेशास अनुसरुन वाहतुक करण्यांत येणा-या जनावारांच्या बाबतीत पशुवैद्यकाचा दाखला असल्याबाबत खातरजमा करण्यांत यावी.

जिल्हाधिकारी कार्यालय
शाखा:-
आवक नं.:- 2329
- 7 JUN 2011
विशेष नोंद वही नं.:-
कार्य विवरण नं.:-

३. जनावरांची योग्य प्रकारे वाहतूक होण्याच्या दृष्टीने सर्व संबंधितांनी नियमान्वये विहीत केलेल्या तरतुदीनुसार आवश्यकती अंमलबजावणी करण्याबाबत पुन्हा निदेश देण्यात येत आहेत. योग्य प्रकारे वाहतूक न करणाऱ्या वाहनचालक/मालकाविरुध्द केलेल्या कारवाईबाबत

तपशीलवार माहिती पोलीस महासंचालक/परिवहन आयुक्त यांना दर ३ महिन्यांनी क्षेत्रिय कार्यालयांनी सादर करावी.

४. वरील सूचनांचे पालन योग्य पद्धतीने होईल याची दक्षता घ्यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(रा. गो. गायकवाड)
कक्ष अधिकारी, गृह विभाग, महाराष्ट्र शासन

प्रत,

पोलीस महासंचालक, महाराष्ट राज्य, मुंबई
विशेष पोलीस महानिरिक्षक (वाहतुक), महाराष्ट राज्य, मुंबई
सर्व पोलीस आयुक्त,
सह पोलीस आयुक्त (वाहतुक), बृहन्मुंबई
परिवहन आयुक्त, महाराष्ट राज्य, मुंबई
सचिव (पशुसंवर्धन), कृषी व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई
आयुक्त, पशुसंवर्धन, महाराष्ट राज्य, पुणे-१
सर्व जिल्हाधिकारी
सर्व पोलीस अधिक्षक
सर्व प्रादेशिक परिवहन अधिकारी
सर्व उप प्रादेशिक परिवहन अधिकारी
अवर सचिव (कार्या. विशा-१ ब), गृह विभाग मंत्रालय, मुंबई
उप सचिव (कार्या. पोल-८), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई
निवड नस्ती (कार्यासन परि-२)

प्रत माहितीसाठी-

मा. मुख्यमंत्री, महाराष्ट शासन यांचे प्रधान सचिव
मा. उप मुख्यमंत्री, महाराष्ट शासन यांचे सचिव
मा. मुख्य सचिव, महाराष्ट शासन यांचे स्वीय सहायक
सचिव (परिवहन व राउशु) यांचे स्वीय सहायक
प्रधान सचिव (कृषी व पदुम विभाग) यांचे स्वीय सहायक

E:\tra-2\R.G.GAIKWADletter.lwp327